# <u>प्रेसनोट</u>

दिनांक १७/११/२०२१

## आर.टी.ओ.कार्यालय परभणी येथील मोटार वाहन निरीक्षक नागनाथ महाजन यांचेसाठी लाच स्विकारताना खाजगी इसम अनिस खान यांना ६,०००/— रू. लाच स्वीकारतांना नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहाथ पकडण्यात आले

दिनांक १७/११/२०२१ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, ''यातील लोकसेवक महाजन हे तक्रारदार यांचे थर्मल पावर स्टेशन परळी येथील राखेची वाहतुक परभणी जिल्हयात करू देण्यासाठी दोन गाडयाचे ६,०००/— रू. लाचेची मागणी करीत आहेत''.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन दिनांक १७/११/२०२१ रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये लोकसेवक महाजन यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे उपरोक्त कामासाठी खाजगी इमस अनिस यांना भेटण्याचे सांगीतल्याने अनिस यांची भेट झाल्यानंतर त्यांनी तक्रारदार यांचे उपरोक्त कामासाठी दोन गाडयाचे ६,०००/— रू. लाचेची मागणी केल्याबाबत निष्पन्न झाले.

त्यावरून आजच दिनांक १७/११/२०२१ रोजी सुपर मार्केट वरील देशमुख पेट्रोलपंप परिसरात लावण्यात आलेल्या सापळया दरम्यान खाजगी इसम अनिस खान यांनी तक्रादार यांचेकडुन उपरोक्त कामासाठी मागणी केलेली लाचेची रक्कम ६,०००/— रू. स्वत: लोकसेवक महाजन यांचेसाठी स्विकारली. म्हणुन लोकसेवक नागनाथ महाजन, मोटार वाहन निरीक्षक, परभणी व खाजगी इसम अनिसखान गुलाम दस्तगीरखान वय ४८ वर्ष, व्यवसाय ट्रान्सपोर्ट रा. युसुफ कॉलनी, परभणी यांचे विरूध्द पोलीस ठाणे मोंढा येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१२ अन्वये गुन्हा दाखेल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्रीमती कल्पना बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधिक्षक, राजेंद्र पाटील, पोना जगन्नाथ अनंतवार, अंकुश गाडेकर, ईश्वर जाधव नरेंद्र बोडके यांनी पार पाडली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास भरत के. हुंबे, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि परभणी हे करीत आहेत.

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमाकावर संपर्क करावा.

**<u>दुरध्वनीक्रमांक ०२४५२—२२०५९७</u>**

**<u>टोलफ्रीक्रमांक १०६४</u>**

**<u>Email ID - dyspacbparbhani@gmail.com</u>**

श्रीमती. कल्पना बारवकर,,पोलीस अधिक्षक,ला. प्र. वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड — ८८८८८४१९६५
श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला. प्र. वि. परभणी — ७०२१००२११०
श्रीमती.स्वप्नाली धुतराज, पोलीस निरीक्षक ला. प्र. वि. परभणी — ८३०८२४१९००

Scanned with CamScanner